# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 20 January 2026

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २० जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे राज्याची वाटचाल वेगवान करण्यासाठी दावोस परिषद निर्णायक–मुख्यमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- नांदेड इथं नियोजित हिंद दी चादर सोहळ्याच्या आमंत्रणाचा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून स्वीकार
- राज्यातल्या सर्व मनपा महापौर पदांची येत्या गुरुवारी मंत्रालयात आरक्षण सोडत

आणि

- जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपसोबत युतीसाठी शिवसेना आग्रही

****

राज्याची एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल वेगवान करण्यासाठी दावोस परिषद निर्णायक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. काल दावोस इथं आर्थिक परिषदेत सहभागी होण्यापूर्वी महाराष्ट्र पॅव्हेलियन मध्ये त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. या परिषदेत गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून, यंदा त्याहून अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले,

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

२०३० पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न चार हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलं आहे. २०२५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने चार ट्रिलियन डॉलरचा टप्पा गाठला. पुढल्या दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरचं लक्ष्य गाठेल असं एसबीआयच्या या अहवालात म्हटलं आहे.

****

विकसित भारत जी राम जी योजनेबाबत काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याची टीका केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. यापूर्वीच्या मनरेगा योजनेतून काँग्रेसने दिलेले हक्क केवळ कागदावर राहिले आपल्या सरकारने गरजूंना १२५ दिवस रोजगाराचा हक्क दिल्याचं चौहान यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान**

****

भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदासाठी पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांनी काल आपला अर्ज दाखल केला. दिल्लीत पक्ष मुख्यालयात भाजपच्या निवडणूक अधिकाऱ्यांकडे त्यांनी अर्ज सादर केला. पक्षाचे अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

****

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारीला होणाऱ्या 'हिंद दी चादर' या सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना आमंत्रण देण्यात आलं आहे. राज्यस्तरीय सत्संग समिती सदस्यांनी काल नवी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना या कार्यक्रमाचं आमंत्रण दिलं. नांदेडच्या मोदी मैदानावर होणाऱ्या सोहळ्यास २५ तारखेला उपस्थित राहण्याचं आमंत्रण शहा यांनी स्वीकारल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांची आरक्षण सोडत येत्या गुरुवारी मंत्रालयात काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया राबवली जाईल. महापौर पदासाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर विविध महानगरपालिकांमध्ये महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल आणि सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग येईल.

**

मुंबईत महायुतीचाच महापौर होणार असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल मुंबईत बोलत होते. नागरिकांनी याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असं ते म्हणाले.

दरम्यान, उल्हासनगर महानगरपालिकेत वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या दोन नवनिर्वाचित नगरसेवकांनी शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. आपल्या पाठिंब्याचं पत्र या नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे सुपूर्द केलं.

****

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपसोबत युतीसाठी आग्रही राहण्याची सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षातल्या नेत्यांना केली आहे. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी ही माहिती दिली. महापालिका निवडणुकीत पक्षाच्या असमाधानकारक कामगिरीबाबत शिंदे यांनी नाराजी व्यक्त केल्याचंही शिरसाट यांनी सांगितलं.

****

कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यातला सीमा वाद ७० वर्ष उलटून गेल्यावरही मिटलेला नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आणि निंदनीय असल्याचं मत प्राध्यापक आनंद मेणसे यांनी व्यक्त केलं. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं विवेकानंद व्याख्यानमालेत बोलत होते. या वेळी केलेल्या भाषणात मेणसे म्हणाले...

**बाईट– प्राध्यापक आनंद मेणसे**

या व्याख्यानमालेत आज इतिहासकार राम पुनियानी तर उद्या विचारवंत अपूर्वानंद झा यांचं व्याख्यान होणार आहे. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी आपल्या प्रचारासाठी झालेल्या एकूण खर्चाचा तपशील ३० दिवसांच्या आत निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्यास संबंधित सदस्याची सदस्यता रद्द होऊ शकते, असा इशारा मनपा आयुक्तांनी दिला आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी आठ तालुक्यातून २८६ इच्छुकांनी एक हजार ३१५ उमेदवारी अर्ज घेतले आहेत. त्यापैकी कालपर्यंत जिल्हा परिषदेसाठी २७ तर पंचायत समिती साठी २२ असे एकूण ४९ अर्ज दाखल झाले.

****

परभणी इथं चाचा नेहरू बाल महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. श्री शिवाजी क्रीडांगणावर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते काल या महोत्सवाचं उद्घाटन झालं. जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी कार्यालयाकडून आयोजित या महोत्सवात सर्व शासकीय तसंच अशासकीय संस्थांच्या बालगृहातल्या बालकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

****

कॉपीमुक्त अभियान राबवणं हे फक्त परीक्षा पद्धती सुधारणा नसून, भविष्यातले नीतीमान नागरिक घडवण्याचं अभियान असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या अनुषंगाने कॉपीमुक्त अभियान राबविण्यासंदर्भात मुख्याध्यापक, शिक्षकांची सभा काल शहरात झाली, त्यावेळी ते बोलत होते. हे अभियान यशस्वी करणं ही सर्व संबंधित विभागांची सामुहिक जबाबदारी असून या अपप्रवृत्ती विद्यार्थ्यापासून दूर ठेवण्यावर भर देण्याचं आवाहन स्वामी यांनी केलं.

****

परभणी इथं येत्या दोन ते १० फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या सय्यद शाह तुराबुल हक ऊर्सनिमित्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी काल आढावा बैठक घेतली. या ऊर्ससाठी मराठवाड्यासह शेजारील राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक शहरात येतात त्या अनुषंगाने सर्व व्यवस्था चोख ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

****

केंद्र शासनाच्या ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत, मोबाईल ॲपद्वारे रब्बी हंगामाची ई-पीक पाहणी मोहिम गेल्या १० डिसेंबरपासून सुरु झाली आहे. बीड जिल्ह्यात कालपर्यंत तीन पूर्णांक १२ शतांश टक्के शेतकऱ्यांकडून पाहणी पूर्ण करण्यात आली. शेतकऱ्यांनी स्वतःहून केलेली पीक नोंदणी अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्यानं जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानासंदर्भात धाराशिव इथं काल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी आढावा बैठक घेतली. जिल्ह्यात गावपातळीवर ग्रामसभेतून तसंच शाळा–महाविद्यालयातून जिल्हा कुष्ठरोग मुक्त करण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याचे निर्देस त्यांनी यावेळी दिले. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी दरम्यान कुष्ठरोग निवारण पंधरवडा राबवण्यात येणार आहे.

****

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील कृषी विमान संघाने, दिल्लीत ग्रेटर नोएडा इथल्या गौतम बुद्ध विद्यापीठात झालेल्या 'निडर २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत 'प्रिसीजन ॲग्रीकल्चर' या विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या संघाला दिड लाख रुपये पारितोषिक प्रदान करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात डिजिटल युगातील कोशीय लिखाण: संकल्पना तंत्र आणि स्वामित्व हक्क या विषयावरील कार्यशाळेला कालपासून प्रारंभ झाला. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते या कार्यशाळेचं उद्घाटन झालं.

****

राज्यात काल सर्वात कमी अकरा पूर्णांक दोन दशांश सेल्सियस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल नाशिक इथं अकरा पूर्णांक चार तर जळगाव इथं अकरा पूर्णांक आठ दशांश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यातल्या तापमानात वाढ झाली असून, बीड इथं किमान १५ अंश, तर परभणी तसंच छत्रपती संभाजीनगर इथं साडे सोळा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****